

|| वर्ष - 7 | अंक - 321 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- आढळराव पाटलांना जनप्रतिसाद!
- पूतनामावशीचे पर्यावरणप्रेम!
- नाना पटोलेंचा अपघात की घातपात?
- 'INDIA' विकासविरोधी!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 11 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी प्रशासची डोळेझाक

# 'तालेरा' रुग्णालयाला हवा 'बुस्टर डोस'!

### नागरिकांमध्ये नाराजी : सहा वर्षांपासून रुग्णालयाचे काम सुरूच

। पिंपरी । महाईन्यूज

**चिंचवडगाव येथील तालेरा रुग्णालयाच्या नवीन इमारतीत अद्याप रुग्णालय सुरू झालेले नाही. गेल्या सहा वर्षांपासून या रुग्णालयाचे काम सुरू आहे. हे रुग्णालय सुरू होण्यासाठी आणखी किती दिवस प्रतीक्षा करावी लागणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.**




वाढत्या महागाईमुळे वैद्यकीय सेवा-सुविधाही दिवसेंदिवस महाग होत आहेत. वैद्यकीय सुविधा आणि उपचार सर्वसामान्य नागरिकांच्या बजेटबाहेर जात असल्यामुळे महापालिकेच्या रूग्णालयात नागरिकांची उपचारासाठी पसंती असते. त्यामुळेच महापालिकेच्या वायसीएम, थेरगाव, आकुर्डी, पिंपरीतील जिजामाता, भोसरी या मोठ्या रूग्णालयासह सर्वच दवाखान्यात मोठी गर्दी असते. एका दिवसात सुमारे दहा रूग्ण बाह्यरूग्ण विभागात उपचार घेत आहेत. महापालिकेच्या तालेरा रुग्णालयाची जुनी इमारत पाडून तेथे नवीन पाच मजली रुग्णालय इमारत उभारली आहे. इमारतीला रंगरंगोटी झाली आहे. आवश्यक फर्निचर, विद्युतविषयक विविध कामे आणि ऑपरेशन थिएटरचे काम सध्या सुरू आहे. त्याचप्रमाणे, रुग्णालयासाठी आवश्यक वैद्यकीय सामग्रीची व्यवस्था केली जात आहे. ही इमारत उभारण्यासाठी 1 मार्च 2018 रोजी कामाचे आदेश दिले होते. जवळपास सहा वर्षांचा कालावधी उलटला आहे.नवीन रुग्णालय इमारतीत मल्टीस्पेशालिटी सुविधा सुरू करण्याचे महापालिका प्रशासनाचे नियोजन आहे.

चिंचवडगाव, काळेवाडी, केशवनगर, काकडे पार्क, वेताळनगर, वाल्हेकरवाडी, थेरगाव अशा विविध परिसरातून चिंचवडगाव येथे महापालिकेच्या वतीने सुरू असलेल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालयात उपचार केले जातात. मात्र, रूग्णसेवेचा वाढता ताण लक्षात घेता या रुग्णालयाशेजारीच उभारलेल्या नवीन इमारतीत रुग्णालय तातडीने सुरू होणे गरजेचे आहे. मात्र, कामाचा असलेला संथ वेग आणि महापालिका प्रशासनाकडून दाखविली जाणारी डिलाई यामुळे हे रुग्णालय अद्याप सुरू होऊ शकलेले नाही.

### रुग्णालयात या सुविधा मिळणार...



»बाह्य रुग्ण विभाग 12 तपासणी कक्ष, क्ष-किरण तपासणी, पुरुष व महिलांचा मेडिकल वॉर्ड (36 खाटा), अद्ययावत ऑपरेशन थिएटर कॉम्प्लेक्स-4, कान-नाक-घसा व नेत्र विभाग (16 खाटा), अस्थिरोग विभाग (20 खाटा), 24 तास फार्मसी, आपत्कालीन ऑपरेशन थिएटर कॉम्प्लेक्स, आपत्कालीन अतिदक्षता विभाग, 100 आसन व्यवस्था असलेले सभागृह, दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी पार्किंग.

# पुणे- लोणावळा लोहमार्गासाठी महायुतीचा निधी!

## » खासदार श्रीरंग बारणे : घटक पक्षांच्या संयुक्त बैठकीत माहिती

। लोणावळा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील महायुती सरकारने 2,500 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे पुणे लोणावळा लोहमार्गाच्या चौपदरीकरणाचा विषय मार्गी लागला आहे, अशी माहिती मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी-आरपीआय-रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आज दिली.



खासदार बारणे यांच्या प्रचारासाठी लोणावळा येथे महायुतीच्या घटक पक्षांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात ते बोलत होते.

बैठकीस लोणावळ्याच्या माजी नगराध्यक्ष सुरेखा जाधव, माझी उपनगराध्यक्ष श्रीधर पुजारी, रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, भाजपचे शहराध्यक्ष अरुण लाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष विलास बडेकर, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजू खांडभोर, लोणावळा शहर प्रमुख संजय भोईर, युवा सेना प्रमुख विवेक भांगरे, महिला आघाडी प्रमुख मनीषा भांगरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

> "पुणे-लोणावळा लोहमार्गाच्या चौपदरीकरणाचे काम मागील सरकारच्या नाकर्तेपणामुळे रखडले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने अडीच हजार कोटी रुपयांचा राज्याचा वाटा मंजूर करून तो विषय मार्गी लावला. लोणावळा कर्जत मार्गाचे कामही होत आहे. लोणावळ्यासह रेल्वे स्थानकांचा विकास देखील झपाट्याने सुरू आहे.
>
> **-श्रीरंग बारणे, खासदार.**

कार्ला येथील एकविरा देवस्थानला तीर्थविकास प्राधिकरणाचा दर्जा देण्यात आला आहे. लोणावळा, खंडाळा, माथेरान पर्यटन स्थळ विकासासाठी 250 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. मावळ्यातील 100 पेक्षा जास्त गावात खासदार म्हणून आपण विकास निधी दिला आहे. शहरी भागात देखील विकास निधी कमी पडू दिलेला नाही.

# ...म्हणून आढळराव पाटलांना जनप्रतिसाद!

## आमदार अतुल बेनके : खासदार कोल्हेंच्या टिकेचा घेतला समाचार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या पाच वर्षात मतदारसंघात फिरकलेच नसल्याने ठिकठिकाणी त्यांच्याविरोधात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. अलिकडेच शिरोली फाट्याजवळ खासदार अमोल कोल्हे यांच्याविरोधात पोस्टर लावत गावकऱ्यांनी काही प्रश्नांची सरबत्ती केली होती. तर दुसऱ्या बाजूला माजी खासदार आणि महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील मागच्या निवडणुकीत पराभव होऊनही जोमाने काम करतांना दिसत आहे. यावरून अमोल कोल्हे यांनी आढळरावांवर टिका केली होती. त्यावर आता राष्ट्रवादी अजित पवार गटातील आमदार अतुल बेनके यांनी कोल्हेंचा चांगलाच समाचार घेतला आहे.**






आढळरावांना विजयी करण्यासाठी महायुतीच्या सर्व नेत्यांनी जोरदार सुरूवात केलीय. राष्ट्रवादी अजित दादा गटाचे आमदार अतुल बेनके देखील दररोज गावकऱ्यांच्या गाठीभेटी घेतांना दिसत आहेत. यातच त्यांनी कोल्हे यांच्यावर टिका करत आढळरावांचं कौतुक केलं आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमोल कोल्हे गेल्या पाच वर्षांत कोरोना काळ वगळता मतदारसंघामध्ये फिरकलेच नाहीत, याउलट शिवाजीराव आढळराव कोरोना काळ आणि त्यानंतर देखील पायाला भिंगरी बांधल्यागत संपूर्ण मतदारसंघामध्ये जनतेची कामे मार्गी लावण्यासाठी फिरत राहिले आणि म्हणूनच आज शिवाजीराव आढळराव यांना शिरूर लोकसभा मतदारसंघामध्ये जनतेचा मोठा प्रतिसाद पाहायला मिळतोय, असे प्रतिपादन जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांनी केले.

दरम्यान, आढळरावांचा प्रचार करतांना अतुल बेनके यांना आलेला एक अनुभव त्यांनी कथन केला आहे. ते म्हणाले की, अजितदादा पवार यांचे आणि त्यांच्या कार्यपद्धतीचे अनेक चाहते राज्यभर भेटतात. शिरुर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित जनसंवाद दौऱ्यादरम्यान असेच अजितदादांवर प्रेम करणारे एक व्यक्तिमत्त्व भेटले.

बोरी बु. गावचे बाळासाहेब जाधव यांची आज भेट झाली, त्यांनी अजितदादांचे अनेक अनुभव सांगत त्यांच्या विकासाच्या कार्य पद्धतीचे कौतुक केले. आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांबद्दल अतोनात आदर आहेच. परंतु भविष्यात महाराष्ट्र राज्याला गतीने पुढे नेण्याची क्षमता फक्त अजितदादांमध्ये आहे तेच सक्षमपणे नेतृत्व करू शकतात असे जनसामान्यांचे मत आहे असेही त्यांनी आवर्जून सांगितले. जाधव यांनी यावेळी माननीय अजितदादांशी केलेले जुने पत्र व्यवहार, फोटोंच्या स्वरूपातील आठवणींना उजाळा दिला तसेच जाधव यांनी जुन्नर तालुक्याच्या विकासकामांबद्दल समाधान व्यक्त केल्याचंही बेनके यांनी सांगितलं.

### अमित शाहांभोवती पिंगा घातला...

» नरेंद्र मोदी यांनी संसदेत कौतुक केल्यानंतर तुम्ही किती दिवस त्यांच्या पदराखाली लपणार ? भाजप प्रवेशाच्या वेळी कितीवेळा तुम्ही अमित शाह यांच्या भोवती पिंगा घातला. हे सर्वांना माहिती आहे. एखादा खासदार निवडून गेल्यानंतर आपल्या मतदारसंघात किती टक्के उपस्थितीत होती. ते आपण स्वतलाच विचारा. ज्या ज्या गावात तुम्ही भाषणं केली आहेत. याआधी तुम्ही कधीच त्याठिकाणी आले नाही. त्याठिकाणी तुमचा शुन्य रूपयाचा निधी आहे. त्यामुळेच विकास काम तर करायची नाही, मात्र इतर गोष्टींच्या गप्पा हाणायच्या. याला आता लोकं भुलणार नाहीत. तुम्ही लोकांना बराच वेळा भुलवण्याचं काम केलं आहे. त्यांना फक्त काम पाहिजे. त्यामुळेच आता शिवाजीराव आढळराव पाटील घड्याळ चिन्हावर निवडून आल्याशिवाय राहणार नाही. असाही हल्लाबोल आमदार बेनके यांनी केलाय.

# मोहोळ यांच्या प्रचारात 'होम मिनिस्टर'ही आघाडीवर!

## मोनिका मोहोळ यांचा दौरा : 6 विधानसभा मतदारसंघातील भेटीगाठींचा टप्पा पूर्ण

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या निवडीची प्रक्रिया सर्वात अगोदर सुरू केली. पक्षाच्या दुसऱ्याच यादीत दि. १३ मार्चला पुणे लोकसभा मतदार संघातून पक्षाने मुरलीधर मोहोळ याचे नाव जाहीर केले. नावाची घोषणा झाल्यानंतर मोहोळ यांनी ग्रामदेवतांच्या दर्शनाने आपल्या प्रचाराला सुरूवात केली. या देवदर्शनापासूनच मोहोळ यांच्या पत्नी आणि माजी नगरसेविका मोनिका मोहोळ यांनी निवडणुकीच्या रणधुमाळीत आपण सक्रिय होत असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी पक्षातील महिला कार्यकर्त्या आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या साथीने भेटीगाठी सुरू केल्या. त्यामुळे सुरूवातीपासूनच मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचाराच्या एका बाजूची धुरा होम मिनिस्टरनी सांभाळले असल्याचे अधोरेखीत झाले आहे.**



भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस-रिपब्लीकन पक्ष (आठवले गट) व मित्र पक्षांच्या महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ मोनिका मोहोळ यांनी शहरातील सहाही विधानसभा मतदारसंघातील मान्यवर, आजीमाजी नगरसेवकांच्या घरी जाऊन त्यांच्या भेटीगाठी घेण्यास सुरूवात केली. गेल्या पंधरा दिवसात त्यांनी मतदारसंघात अनेकांच्या भेटीगाठी घेतल्या. या भेटीगाठी दरम्यान शक्य झाले तिथे त्या स्थानिक कार्यकर्त्यांच्याही घऱी जाऊन त्यांना भेटत आहेत. निवडणूक प्रचार याबद्दल कार्यकर्त्यांची मत त्यांनी जाणून घेतली. सध्याचा वाढता उन्हाळा बघून त्या कार्यकर्त्यांना उन्हापासून बचाव करत प्रचार आणि पक्षाचे काम करा. आपल्याला १३ मेपर्यंत ही लढाई लढायची असल्याने आपण आजारपणामुळे प्रचारापासून दुर रहाणार नाही याची काळजी घ्या, काही मदत लागली तर सांगा असे आवर्जून सांगत होत्या.

या आपल्या पहिल्या प्रचार फेरीबद्दल मोनिका मोहोळ यांनी सांगितले की, 'मी महापालिकेत नगरसेविका म्हणून काम केले आहे. यात महापालिकेत अनेक सहकारी नगरसेवकांशी नव्याने ओळख झाल्या, मैत्रीही झाली. या पाच वर्षात मला समाजकारण आणि लोकांची कामे करण्याचे स्वातंत्र्य देत मुरलीधरआण्णांनी मला एकप्रकारे प्रशिक्षणच दिलं आहे.

लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचारात पुढे कधीतरी सहभागी व्हावेच लागणार होते, मग सुरूवातीपासूनच का आपण यात सहभागी होऊ नये ! म्हणून या अनुभवाच्या जोरावरच मी सुरूवातीपासूनच प्रचारात सक्रिय होण्याचे ठरवले आणि त्याप्रमाणे स्वतंत्रपणे भेटीगाठी घेतल्या.

### पाच निवडणुकांचा अनुभव...

» 'मला जवळपास पाच निवडणुकींचा अनुभव असून तो अनुभव आज महत्त्वाचा ठरत आहे. भेटीगाठींमधून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जनसामान्यांच्या विश्वासाची साक्ष पदोपदी मिळत आहे. मी जवळपास सहाही विधानसभा मतदारसंघात जाऊन आले आहे. यापुढेही पक्षाच्या वतीने जसे नियोजन केले असेल तसे प्रचारात आपण सहभागी होणार असल्याचेही मोनिका यांनी स्पष्ट केले. पुणे शहरात लोकसभेसाठी १३ मे यादिवशी मतदान होणार असून अद्याप निवडणुकीची अधीसूचना जाहीर झालेली नाही. त्यात उन्हाचा कडाका वाढत असताना मोहोळ यांच्या भेटीगाठी वाढल्या असून महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून प्रचाराच्या नियोजनाची लगबग सुरू आहे. गेले काही दिवस रोज शहरातील मान्यवरांपासून सर्वसामान्यांपर्यंत अनेकांच्या भेटीगाठी घेण्याचे काम मुरलीधर मोहोळ व त्यांच्या होम मिनिस्टर या स्वतंत्रपणे करत आहेत. मधेच संस्था किंवा समाजांच्या मेळाव्याला उपस्थित रहात असून समाजबांधवांशी संवाद साधत आहेत.

# नेत्यांचे मनोमिलन; कार्यकर्त्यांचे सूत जुळेना!

## महायुतीमध्ये कार्यकर्त्यांची घुसमट : बारणे, आढळराव दोघांची अडचण

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील बदललेली राजकीय परिस्थिती आणि स्थानिक पातळीवरील कुरघोड्यांचे राजकारण यामुळे राज्य पातळीवर नेत्यांचे मनोमिलन झाले असले, तरी कार्यकर्त्यांचे सूत मात्र जुळत नाही. त्रिपक्षीय कार्यकर्त्यांची घुसमट होत असून, महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे व शिवाजीराव आढळराव पाटील यांची अडचण होत आहे.**




ग्राऊंड रिपोर्ट

राज्यात शिवसेना पक्षात फूट पडली आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात पक्ष आणि चिन्ह दोन्ही त्यांच्या ताब्यात गेले. दुसरीकडे, राष्ट्रवादीतून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात पक्ष आणि चिन्ह दोन्ही त्यांच्या ताब्यात आहे. परिणामी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे (मशाल) आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार (तुतारी) या दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी अजित पवार यांच्यावर प्रचंड नाराज आहेत. मावळ लोकसभा मतदार संघाचा विचार करता, २०१९ च्या निवडणुकीत अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांनी श्रीरंग बारणे यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती. त्यामुळे बारणे विरुद्ध अजित पवार समर्थक असे चित्र होते. मात्र, महायुतीच्या धर्माचे पालन करीत आता अजित पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांना खासदार बारणे यांचे काम करावे लागणार आहे. वरिष्ठ पातळीवर अजित पवार यांनी भाजपाशी जुळवून घेतले असले, तरी स्थानिक पातळीवर अजित पवार समर्थक आणि शिवसेना, भाजपाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मनोमिलन झालेले नाही. परिणामी, महायुतीकडे नेत्यांची गर्दी दिसते. पण, ताकदीने काम करण्याची मानसिकता कुणाचीही नाही. बारणे यांचे कट्टर समर्थक वगळता सध्या भाजपा आणि शिवसेनेतील स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते अद्याप सक्रीय झालेले नाहीत.

### दुभंगलेली मने जोडण्याचा प्रयत्न...

दरम्यान, बारामती लोकसभा मतदारसंघात विरोधकांनी डोकी वर काढल्याने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दुभंगलेली मने जोडण्यास सुरुवात केली आहे. इंदापूर येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महायुतीचा मेळावा घेऊन माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचा विरोध कमी केल्यानंतर आता पुरंदरचे माजी आमदार विजय शिवतारे यांचा राग शांत करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत येत्या गुरुवारी 'जनसंवाद सभा' घेतली जाणार आहे. पुणे जिल्ह्यातील अजित पवार यांच्या राजकारणाचा हर्षवर्धन पाटील आणि विजय शिवतारे यांना कायमच त्रास होत आला आहे. सुनेत्रा पवार यांना उमेदवारी दिल्यानंतर अजित पवार यांच्याविरुद्धचा वाचपा काढण्याची ही नामी संधी समजून हर्षवर्धन पाटील आणि शिवतारे यांनी बंडाचा झेंडा उभारला. दोघांनीही अजित पवार यांना उघड आव्हान दिले. त्यामुळे अजित पवार यांच्यापुढे प्रश्न निर्माण झाला आहे.

### शिवाजीराव आढळरावांसाठी तारेवरची कसरत...

शिरूर लोकसभा मतदार संघाचा विचार करता, शिवाजीराव आढळराव पाटील यांनी आयुष्यभर राष्ट्रवादीचा विरोध केला. त्याच राष्ट्रवादीच्या तिकीटावर महायुतीची उमेदवारी आता ते लढवणार आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीतूनच त्यांना विरोध आहे. आमदार दिलीप मोहिते पाटील, माजी आमदार विलास लांडे यांच्याशी समझोता करुन घेण्यात आढळराव यशस्वी झाले असले, तरी स्थानिक पातळीवर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उघडपणे आढळरावांचा प्रचार करण्यास चालढकल करीत आहेत. दुसरीकडे, राष्ट्रवादीशी खुला पंगा घेणारे भाजपाचे माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि भोसरीतील आमदार महेश लांडगेसुद्धा अद्याप पूर्ण ताकदीने प्रचारकार्यात उतरण्याचे दिसत नाही. किंबहुना, " ज्या 'घड्याळ' च्या विरोधात प्रचार करुन आम्ही नगरसेवक झालो. तेच 'घड्याळ' छातीवर घेवून आम्ही मिरवायचे का?" असा प्रश्न भाजपाच्या गोटातून उपस्थित केला जातो. तसेच, राष्ट्रवादीच्या स्थानिक पदाधिकारी, नेत्यांनी जे आरोप केले. ते त्यांनी मागे घेणार आहेत का? असा सूर ऐकायला मिळत आहे.

---

# आयटी हब हिंजवडी, उच्चभ्रू वाकडमध्ये छापा!

## स्पा सेंटरमध्ये वेश्याव्यवसाय : कारवाईत 8 महिलांची सुटका

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड शहरातील आयटी हब हिंजवडी आणि उच्चभ्रू असलेल्या वाकड परिसरात गेल्या तीन दिवसांपासून स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्या चालक, मालकांवर गुन्हा दाखल करत आठ महिलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाला यश आल आहे. यावर्षी आत्तापर्यंत पिटा अंतर्गत ३१ गुन्हे दाखल करण्यात आले असून ३२ पीडित महिलांची सुटका केल्याची कामगिरी केली आहे. तर, ४५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



चिंचवड शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी स्पा च्या नावाखाली महिलांकडून वेश्याव्यवसाय केला जात असल्याच्या अनेक घटना उघडकीस आलेल्या आहेत. पैशांचं आमिष दाखवून महिलांना स्पा सेंटरमध्ये कामाला लावलं जातं. मग त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जातो. अशी माहिती वारंवार समोर आलेली आहे.

पिंपरी- चिंचवड शहरातील हिंजवडी आणि वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये तीन स्पावर धाड टाकून पोलिसांनी आठ महिलांची सुटका करत सहा स्पा चालक आणि मालक यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हिंजवडीत ब्रेथ स्पा आणि वाकडमध्ये द गोल्ड थाई स्पा, द राईस स्पा सेंटरवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने छापा टाकून आठ महिलांची सुटका केली आहे.

# आठ वर्षीय चिमुकल्याने पूर्ण केले रमजानचे ३० उपवास

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



मुस्लीम धर्मात रमजान महिना हा पवित्र महिना मानला जातो. या महिन्यात दररोज उपवास केला जातो. या निर्जल उपवासांना फार महत्व आहे. पिंपरी-चिंचवड मधील आदि जमीर मुल्ला या आठ वर्षांच्या चिमुकल्याने यावर्षी संपूर्ण महिनाभर उपवास पूर्ण केले. एवढ्या लहान वयात त्याने केलेल्या उपवासांबाबत त्याचे कौतुक केले जात आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी-चिंचवड विद्यापीठाचे मार्केटिंग हेड जमीर मुल्ला यांचा मुलगा तर सामाजिक कार्यकर्ते दस्तगीर मुल्ला यांचा नातू आदी मुल्ला याने यावर्षी प्रथमच रमजानचे उपवास केले. पहिल्याच वर्षी त्याने सर्व ३० उपवास पूर्ण केले. कोवळे वय आणि कडक उन्हाळा अशा परिस्थितीत त्याने हे उपवास पूर्ण केल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. इस्लामिक कॅलेंडर नुसार नववा महिना रमजानचा असतो. या महिन्याला मुस्लीम समाजात सर्वात पवित्र महिना मानला जातो. रमजानच्या महिन्यात सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत निर्जल उपवास केला जातो. सूर्यास्त झाल्यानंतर रमजानमध्ये खजूर खाऊन उपवास सोडणे सुन्नत मानले जाते. इस्लामिक मान्यतेनुसार, खजूर हे पैगंबर हजरत मोहम्मद यांचे आवडते फळ होते. ते देखील खजूर खाऊनच रोजा सोडायचे. त्यामुळे मुस्लिम धर्माचे लोकही उपवास सोडण्यासाठी आधी खजूर खातात आणि त्यानंतर इतर पदार्थांचे सेवन करतात. आदिने देखील दररोज दिवसाचे १४ तासांहून अधिक काळ उपवास केला. शाळेची दिनचर्या सांभाळून त्याने कुठेही न ढळता हे उपवास पूर्ण केले आहेत.



भूमिका

# पूतनामावशीचे पर्यावरणप्रेम!

**गेल्या महिन्यात लंडन परिसरातील काही रस्ते मोटार वाहतुकीसाठी पूर्ण बंद ठेवले गेले. स्थानिक रहिवाशांस त्यामुळे मोठी गैरसोय सहन करावी लागली; पण एकाच्याही मुखातून तक्रारीचा सूर उमटला नाही. याच धर्तीवर ऑस्ट्रेलियन सरकार समुद्रकिनाऱ्यांवर जाण्यास पर्यटकांस वारंवार बंदी घालते..**

या किनाऱ्यावर अनेक पंचतारांकित हॉटेले आहेत. पण या बंदीमुळे आपले नुकसान होईल अशी एकही तक्रार तेथील सरकारकडे हॉटेले करीत नाहीत आणि हॉटेलवाल्यांची 'लॉबी' ही बंदी लादली जाणार नाही यासाठी प्रयत्न करीत नाही. ही दोन केवळ उदाहरणे. यातील पहिले लंडनमधील रस्त्यांवर मोटार वाहतूक बंदीचे. ही बंदी घातली गेली कारण तो त्या परिसरातील बेडकांचा विणीचा हंगाम असतो आणि त्या काळात बेडूक दाम्पत्ये शेजारच्या झाडीतून रस्त्यावर येतात. या काळात मोटार वाहतूक बंदी घातली नाही तर बेडूक-बेडकी गाडीखाली येण्याचा धोका असतो. म्हणजे मोटारींवरील बंदी ही बेडकांच्या सुखेनैव वंशवृद्धीसाठी. ऑस्ट्रेलियन सरकारकडून काही किनारे पर्यटकांसाठी मज्जाव-क्षेत्रे घोषित केले जातात कारण त्या विशिष्ट काळात स्थानिक पक्ष्यांचे प्रजनन होते आणि पर्यटकांचे कुतूहल त्यांच्या जिवावर उठण्याचा धोका असतो. या रम्य चित्रावर आपल्याकडे प्राणिमात्रांशी सार्वजनिक वर्तन कसे होते त्याचे स्मरण हा उतारा ठरेल. पिंजऱ्यांतील प्राणी शहाणे वाटावेत- तसे ते असतातच- असे बाहेरून त्यांच्याशी संवाद साधू पाहणारे मनुष्यप्राणी, झाडांवरच्या



घरट्यांची जराही फिकीर न करता सहज होणारी वृक्षतोड आणि ही पृथ्वी जणू आपल्याच मालकीची आहे असे एकंदर मनुष्य म्हणवून घेणाऱ्यांचे वर्तन हे आपले प्राक्तन. त्यावरील भाष्याचे निमित्त म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरणासंदर्भात दिलेला आदेश.

विषय होता राजस्थान/ गुजरात या राज्यांतून उभारले जाणार असलेले उच्च दाब क्षमतेच्या वीजवाहक वाहिन्यांचे जाळे. त्यास काही पर्यावरणवाद्यांनी आक्षेप घेतला. कारण या वीजतारांस धडकून मोठ्या प्रमाणावर बळी पडणारे माळढोक (ग्रेट इंडियन बस्टर्ड) पक्षी. छोटे शहामृग वाटावे इतके आकाराने भव्य असणारे माळढोक एके काळी आपल्याकडे सर्रास आढळून येत. तथापि आता त्यांची संख्या शे-दोनशेवर आली असून हा पक्षी नामशेष होतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पक्ष्याच्या मुळावर आलेल्या अनेकांतील एक महत्त्वाचे कारण म्हणजे उच्च दाब क्षमतेच्या वीजवाहक तारा. या तारांतून जेव्हा वीज वाहत असते तेव्हा त्यांच्याभोवती एक चुंबकीय क्षेत्र तयार होते आणि त्यातून या अशा पक्ष्यांचा बळी जातो. हे वास्तव लक्षात घेऊन न्यायालयाने वीजवाहक तारा हवेतून न नेता जमिनीखालून नेल्या जाव्यात असा आदेश दिला. पण ते करणेही अवघड. याचे कारण जमिनीखालून न्यावयाच्या वाहिन्या अगदी जाडजूड लागतात आणि त्याहीपेक्षा मुख्य कारण म्हणजे त्या एकसलग लांब तयारच केल्या जात नाहीत. त्यामुळे अधिक जोड देणे आले आणि अधिक जोड म्हणजे अधिक वीजघट किंवा पारेषण हानी (ट्रान्स्पोर्ट अँड डिस्ट्रिब्युशन लॉसेस). म्हणून असे करणे अव्यवहार्य. गुजरात/ राजस्थानच्या सदर परिसरात मोठ्या प्रमाणावर सौरऊर्जा केंद्रे उभारली जाणार असून त्यांच्या अधिक आणि दूरवर वहनासाठी वीजवाहिन्यांचे जाळे उभारणे आवश्यक आहे. मग पक्ष्यांच्या जगण्याच्या हक्कांचे काय, हा प्रश्न. तो उत्तरासाठी अखेर सर्वोच्च न्यायालयात आला. त्यावर आदेश देताना सर्वोच्च न्यायालयाने या वीजवहनासाठी कोणकोणते पर्याय उपलब्ध असतील याची पाहणी करण्यासाठी तातडीने तज्ज्ञांची समिती नेमण्याचा आदेश दिला आणि या समितीस जुलैअखेरपर्यंतच निश्चित मुदतही घालून दिली. हे योग्यच. पण तसे करण्याचा आदेश देताना सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी पर्यावरण, नागरिकांचा स्वच्छ पर्यावरणाचा अधिकार, पर्यावरणस्नेही ऊर्जास्रोत इत्यादींविषयी भाष्य केले. ते अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण ते स्वच्छ पर्यावरणास नागरिकांच्या जगण्याशी जोडते. म्हणजे आपली राज्यघटना ज्याप्रमाणे सर्व नागरिक आणि जीवांस जगण्याचा हक्क देते त्याचप्रमाणे या जगण्याच्या हक्कासाठी नागरिक स्वच्छ पर्यावरणाची मागणी करू शकतात; किंबहुना तो त्यांचा मूलभूत हक्कच आहे, असा नि:संदिग्ध निर्वाळा सर्वोच्च न्यायालय देते. पर्यावरणप्रेमींनी दाखल केलेल्या या याचिकेस विरोध आहे तो अर्थातच सरकारचा. तो करताना या वीजवाहिन्यांची उभारणी ही किती अत्यावश्यक आहे, आंतरराष्ट्रीय करार, पर्यावरणस्नेही ऊर्जा निर्मितीची गरज इत्यादी कारणे सरकारने पुढे केली आणि सर्वोच्च न्यायालयानेही त्याचा सहानुभूतीने विचार करत त्यास दुजोरा दिला. इ.स. २०७० पर्यंत आपणास शून्य कर्बउत्सर्जनाचे उद्दिष्ट गाठावयाचे आहे त्यासाठी सौरऊर्जा निर्मिती किती आवश्यक इत्यादी मुद्दे सरन्यायाधीश या आदेशात मांडतात. ते रास्तच. परंतु या देशातील सर्वात मोठा प्रदूषक हा सरकारच आहे याकडे कसे दुर्लक्ष करणार? बॅटरी-चलित वाहनांची मागणी मंदावत आहे हे वास्तव लक्षात घेण्यास सरकार तयार नाही आणि सौरऊर्जाही पूर्ण पर्यावरणस्नेही नाही, हे त्यास जणू ठाऊकच नाही.

## संपादकीय »

### प्रवक्त्यांची पक्षांतरे!

***राजकीय पक्षाचे प्रवक्तेपद मिळणे म्हणजे पक्षाची ध्येयधोरणे मुखोद्गत असल्याची पावती आणि पक्षनिष्ठेला दाद ही समजूत अलीकडे खोटी ठरते की काय अशी शंका वारंवार येऊ लागली आहे.***

याला कारण पक्षाच्या प्रवक्त्यांचेच होणारे पक्षांतर. ताजा संदर्भ आहे तो गौरव वल्लभ यांचा. आजवर अनेक व्यासपीठांवरून काँग्रेसची बाजू हिरिरीने मांडणारे हे अर्थशास्त्राचे प्राध्यापक रातोरात भाजपमध्ये प्रवेश करते झाले. ही कृती करताना त्यांनी केलेले वक्तव्यही मोठे मजेशीर. काँग्रेसशी आघाडी केलेल्या डीएमकेच्या एका नेत्याने सनातन धर्माविषयी केलेले वक्तव्य. काँग्रेसच्या काही नेत्यांकडून त्याची केली गेलेली पाठराखण, राम मंदिराच्या मुद्द्यावर पक्षाने घेतलेली अलिप्ततावादी भूमिका, हे सारे दोन-तीन महिन्यांपूर्वीचे मुद्दे, पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांकडून उद्योगपतींना केले जाणारे लक्ष्य या कारणांनी या महाशयांची रात्रीची झोप उडाली होती म्हणे! शेवटी किती काळ रात्री जागून काढायच्या असा विचार करत त्यांनी कमळ हाती घेतले.

**गेली काही वर्षे मराठा आरक्षणाबाबत एकीकडे आंदोलनांच्या लाटा आणि दुसरीकडे, हंगामी तोडग्यांच्या वाटा; असा पाठशिवणीचा दुर्दैवी खेळ चालू आहे. यातून महाराष्ट्राची कायमची सुटका करण्यासाठीची राजकीय इच्छाशक्ती केवळ मुंबईत नव्हे तर राजधानी दिल्लीत असणे आवश्यक आहे.**

# पाठशिवणीचा दुर्दैवी खेळ!

महाराष्ट्रात विविध समाजांना आणि विशेषकरून मराठा समाजाला आरक्षण देण्यावरून जी कमालीची गुंतागुंत आणि अस्वस्थता निर्माण झाली आहे; तिच्यावर मागासवर्ग आयोगाचा अहवाल हे टिकाऊ उत्तर आहे का; याची बिलकुल शाश्वती नाही. या आयोगाचा अहवाल स्वीकारून विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात मराठा समाजासाठी दहा टक्के आरक्षण देण्याचा ठराव मंजूर करण्यात येईल, असे सांगितले जाते. असे हे दुसऱ्यांदा होते आहे. मागे उच्च न्यायालयाने उचलून धरलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने नामंजूर केले होते. तसे पुन्हा होणारच नाही, याची आज काहीही हमी नाही. राज्य सरकारने मांडलेला प्रस्ताव विधिमंडळाने मंजूर केला तरी त्याची घटनात्मक वैधता पुन्हा न्यायालयीन प्रक्रियेत तपासली जाऊ शकते. आता यावेळी मागासवर्ग आयोगाच्या अहवालाच्या मागे राज्यभरात झालेले अडीच कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण ही एक भक्कम पाठराखण आहे, अशी अनेकांची समजूत आहे. ती खरी आहे का आणि हे सर्वेक्षण कितपत शास्त्रीय पद्धतीने



तसेच बिनचूक झाले आहे, या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. ती अनेकांना सोयीची नसली तरी आज ना उद्या शोधली जातीलच. तिकडे मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन चालूच असून त्यांच्या वारंवार होणाऱ्या उपोषणांमुळे त्यांची व त्यांच्या आंदोलनाची तब्येतही घसरत चालली आहे. ती कशी सावरली जाणार, हा ही एक प्रश्न आहे. महाराष्ट्र गेली अनेक वर्षे या प्रश्नामुळे अस्वस्थ आहे. कोणाचेही सरकार आले तरी ते या प्रश्नापुढे आजवर हतबल झाले आहे. त्या हतबलतेमागे मुख्यत: घटनात्मक तरतुदींची मर्यादा आहे, हे लक्षात घ्यायला हवे. ही मर्यादा कशी ओलांडायची, हा यातला मूळ प्रश्न आहे आणि तो राज्य सरकार किंवा विधिमंडळाच्या तत्वत: अखत्यारीतील नाही. तसा तो नसल्यानेच सर्वोच्च न्यायालयाने मागे एकदा हे आरक्षण रद्दबातल ठरविले होते. मराठा समाजाच्या भावना व मागण्या आणि कायद्यांची व घटनेची चौकट यांचा ताळा जोवर जमत नाही, तोवर या प्रकरणी निर्णायक व टिकाऊ तोडगा निघणार नाही. राज्य सरकारला मागासवर्ग आयोगाचा अहवाल सादर झाला असला तरी सध्या चालू असणाऱ्या प्रक्रियांमधील विरोधाभास आणि अंतर्विरोध नोंदविणे आवश्यक आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर राज्यात कुणबी नोंदी शोधण्याचे काम चालू झाले. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडतील, त्यांचा समावेश स्वाभाविकच ओबीसी आरक्षणात होऊ शकतो. याला ओबीसी नेते विरोध करीत आहेत आणि प्रतिआंदोलनाच्याही हाका देत आहेत, हा एक वेगळाच मुद्दा झाला. खरा प्रश्न असा आहे की, उद्या विधिमंडळाने मागासवर्ग आयोगाच्या अहवालानुसार मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण दिले तर त्यात या धावपळीने कुणबी दाखला मिळविलेल्या समाजाचा समावेश होणार आहे का? तसा तो होणार असेल तर सध्या ओबीसींमधून आरक्षण मिळविण्याची धावपळ कशासाठी चालू आहे?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज ठाकरेंच्या भूमिकेमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम!

## मनसेला गळती; सात शिलेदारांचा पक्षाला 'जय महाराष्ट्र'

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षाच्या गुढीपाडवा मेळाव्यात महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. लोकसभा, राज्यसभा, विधान परिषद असं काहीही नको, फक्त नरेंद्र मोदी पुन्हा एकदा पंतप्रधान व्हावेत, त्यांच्यासारखं कणखर नेतृत्व देशाला पुन्हा मिळावं म्हणून मी पाठिंबा जाहीर करतो, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. त्यानंतर महायुतीतल्या नेत्यांनी त्यांचे आभार मानले आहेत. तर महाविकास आघाडीने राज ठाकरेंवर टीका करण्यास सुरुवात केली आहे.**



अशातच राज ठाकरेंना त्यांच्याच पक्षातून धक्के बसू लागले आहेत. राज ठाकरेंची भूमिका अनाकलनीय आहे असं म्हणत मनसे नेते कीर्तिकुमार शिंदे यांनी मनसेला अखेरचा 'जय महाराष्ट्र' केला आहे. एक मोठी फेसबूक पोस्ट करत कीर्तिकुमार यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. कीर्तिकुमार शिंदेंपाठोपाठ डोंबिवलीतही मनसेला धक्का बसला आहे. डोंबिवलीमधील मनसेच्या सात शिलेदारांनी पक्षाला रामराम केला आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नरेंद्र मोदी यांच्यासाठी महायुतीला पाठिंबा जाहीर केला आहे. राज ठाकरे यांच्या या घोषणेनंतर डोंबिवलीतील मनसेचे पदाधिकारी मिहिर दवते यांच्यासह इतर सात जणांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. राज ठाकरे यांची बदलती भूमिका पाहून कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम वाढल्याने मी राजीनामा देत आहे असं मिहिर दवते यांनी म्हटलं आहे. मनसेच्या समाज माध्यमांवरील एका समुहात (या समुहात मनसेचे इतर वरिष्ठ पदाधिकारीदेखील आहेत) दवते यांनी त्यांचा राजीनामा शेअर केला आहे.

राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दर्शवल्यानंतर एकीकडे काही मनसे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी जल्लोष केला. तर काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असल्याचं पाहायला मिळत आहे. डोंबिवलीतील मनसे विद्यार्थी सेनेचे शहर संघटक मिहिर दवते यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. दवते यांनी सांगितलं की, मनसेच्या सोशल मिडिया पेजवर मी राजीनामा दिल्याचं स्पष्ट केलं आहे. राज ठाकरे यांच्या बदलत्या भूमिकेमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळेच मी माझ्या पदाचा आणि पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे.

### किर्तीकुमार शिंदेंचा मनसेला जय महाराष्ट्र!

किर्तीकुमार शिंदेंनी त्यांच्या फेसबूक पोस्टमध्ये म्हटलं आहे की, अलविदा मनसे! महाराष्ट्र नवनिर्माण सेना 'भाजप- शिवसेना-राष्ट्रवादी'च्या महायुतीला बिनशर्त पाठिंबा देत आहे. आम्हाला राज्यसभा नको, विधानपरिषद नको, बाकीच्या वाटाघाटी नको. हा पाठिंबा फक्त आणि फक्त नरेंद्र मोदींसाठी आहे..." अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात या शब्दांत आपली भूमिका मांडली आणि त्यांच्या राजकीय भूमिकांचं एक 'अनाकलनीय' वर्तुळ पूर्ण झालं.


# नाना पटोलेंचा अपघात की घातपात?

## प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केला संशय

। नागपूर । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीनिमित्त आयोजित काँग्रेस उमेदवाराची प्रचारसभा आटोपून परत येत असताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या कारचा भंडाऱ्यात भीषण अपघात झाला. भंडारा शहरालगतच्या भिलेवाडा गावाजवळ मंगळवारी मध्यरात्री ही दुर्घटना घडली असून यात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.**





नाना पटोले किंवा त्यांच्याबरोबर कारमध्ये असलेल्या इतर कोणालाही गंभीर दुखापत झालेली नाही. पटोले मंगळवारी आपली सुनिश्चित प्रचारसभा आटपून सुकळी या गावी जात असताना मध्यरात्रीच्या सुमारास मागून येणाऱ्या ट्रकने त्यांच्या उभ्या कारला जोरदार धडक दिली. या धडकेत गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने नाना पटोले या अपघातात थोडक्यात बचावले.

दरम्यान, या अपघातानंतर विरोधी पक्षांमधील काही नेत्यांनी घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांना संपवून भाजपाला निवडणूक जिंकायची आहे का? असा प्रश्न काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी उपस्थित केला आहे. तसेच, नाना पटोलेंच्या गाडीला झालेला अपघात ही अत्यंत गंभीर घटना असून त्यांचा घातपात करण्याचा डाव होता का? अशी शंकाही अतुल लोंढेंनी उपस्थित केली आहे. अतुल लोंढेंपाठोपाठ वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनीदेखील अशीच शंका उपस्थित केली आहे. प्रकाश आंबेडकर यांनी काही वेळापूर्वी अकोल्यात प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, निवडणुकीच्या काळात अशा प्रकारे एखाद्या नेत्याचा अपघात होतो तेव्हा असे विषय सरकारने गांभीर्याने घ्यायला हवेत.

निवडणूक म्हटली की थोडीफार खुन्नस असतेच. ही गोष्ट नाकारता येणार नाही. पोलिसांनी तपास केला पाहिजे. त्या चालकाची चौकशी करायला हवी. मी राज्य सरकारकडे मागणी करेन की, वेगवेगळ्या पक्षांचे जे महत्त्वाचे नेते आहेत त्यांना निवडणुकीच्या काळात अतिरिक्त सुरक्षा पुरवली पाहिजे. या अपघातात नाना पटोलेंना दुखापत झालेली नाही ही चांगली गोष्ट आहे. ते व्यवस्थित आहेत याचं समाधान आहे. त्यांचं आरोग्य असंच राहो अशी मी निसर्गाकडे पार्थना करतो. दरम्यान, ट्रकचालकाचे ट्रकवरील नित्रंयण सुटल्याने हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. पोलीस याप्रकरणी तपास करत आहेत.

# श्री स्वामी समर्थ प्रकटदिनी अक्कलकोटमध्ये भाविकांची मांदियाळी



।सोलापूर।
प्रतिनिधी : महाईन्यूज

दत्तात्रेयाचे अवतार मानले गेलेल्या अक्कलकोटनिवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराजांचा १६८ वा प्रकटदिन सोहळा बुधवारी मंगलमय आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. अक्कलकोटमध्ये भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. पहाटेपासून वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. दुपारच्या प्रखर उन्हातही भाविकांची स्वामी दर्शनाची ओढ कायम होती.

पहाटे मंदिरात श्री स्वामी महाराजांच्या काकड आरतीने श्रींच्या प्रकट दिन सोहळ्यास प्रारंभ झाला. श्री स्वामी समर्थ सेवासार संघाच्यावतीने श्री स्वामी समर्थांना फळ व मिठाईंचे ५६ भोग नैवेद्य अर्पण करण्यात आले. ज्योतिबा मंडपात भजन व नामस्मरण सोहळा झाल्यानंतर हजारो स्वामी भक्तांच्या उपस्थितीत श्रींचा पाळणा सोहळा संपन्न झाला. मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे व अक्कलकोट संस्थानचे श्रीमंत मालोजीराजे भोसले आणि प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते श्रींची आरती झाली. याचवेळी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी मंदिरात धाव घेऊन दर्शन घेतले. सर्व स्वामी भक्तांना प्रसाद वाटप करण्यात आला. भाविकांच्यावतीने होणाऱ्या संकल्पित अन्नदानाच्या माध्यमातून दुपारी देवस्थानच्या मैंदर्गी-गाणगापूर रस्त्यावरील देवस्थानच्या भक्त निवास भोजनकक्षात स्वामी भक्तांना महाप्रसाद देण्यात आला.

# ‘INDIA’ विकासविरोधी!

## कन्हानच्या सभेत पंतप्रधान मोदी यांचे टीकास्त्र

।नागपूर ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पूर्व विदर्भाला सुजलाम-सुफलाम करणारा गोसेखुर्द सिंचन प्रकल्प काँग्रेसमुळे रखडला. केंद्र व राज्यातील महायुतीच्या सरकारने त्याला निधी दिला, असा आरोप करत ‘इंडिया’ आघाडी ही विकास विरोधी आहे, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केली.**



पूर्व विदर्भाला सुजलाम-सुफलाम करणारा गोसेखुर्द सिंचन प्रकल्प काँग्रेसमुळे रखडला. केंद्र व राज्यातील महायुतीच्या सरकारने त्याला निधी दिला, असा आरोप करत ‘इंडिया’ आघाडी ही विकास विरोधी आहे, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केली. महाराष्ट्रातून या आघाडीचा एकही उमेदवार निवडून देऊ नका, असे आवाहन त्यांनी कन्हान येथे झालेल्या जाहीर सभेत केले. पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक आणि भंडारा-गोंदिया या तीन लोकसभा मतदारसंघासाठी रामटेक मतदारसंघात बुधवारी पंतप्रधान मोदी यांची राज्यातील दुसरी प्रचारसभा झाली. यावेळी व्यासपीठावर केंद्रीयमंत्री व नागपूचे भाजप उमेदवार नितीन गडकरी, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित होते. नेहमीप्रमाणे मोदी यांनी या सभेतही ‘इंडिया’ आघाडी विशेषत: काँग्रेस कशी विकास विरोधी आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला. येत्या १९ एप्रिलला तुम्हाला फक्त एक खासदार निवडायचा नाही, तर पुढच्या एक हजार वर्षांचा पाया मजबूत करण्यासाठी मतदान करायचे आहे. आपल्याला विकसित भारताच्या संकल्पासाठी मतदान करायचं आहे, असे मोदी म्हणाले. आघाडी विकास विरोधी असल्याचे सांगताना त्यांनी भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द सिंचन प्रकल्पाचे उदाहरण दिले. काँग्रेसच्या काळात अनेक वर्ष हा प्रकल्प निधी अभावी रखडला होता. केंद्रात व महाराष्ट्रात भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारने या प्रकल्पासाठी घसघशीत मदत केली. त्यामुळे पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळाला, असे मोदी म्हणाले. केंद्र सरकारकडून मागासवर्गीय, इतर मागासवर्गीयांसाठी राबवण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती देताना सर्वसामान्य जनतेसाठी आपला संघर्ष सुरूच राहील, असे ते म्हणाले. काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्ण संविधान लागू का केले नाही, सीएला आघाडीचा विरोध का, असे अनेक प्रश्न करीत ‘इंडिया’ आघाडी ताकदवान झाले तर देशाचे तुकडे-तुकडे करतील असा आरोप मोदी यांनी केला.

> “ रामटेकला श्रीरामांचे पाय लागले आहेत. यावेळी अयोध्येत आमचे रामलल्ला भव्य मंदिरात दर्शन देतील. ५०० वर्षांनी हा क्षण येत आहे. पण प्राणप्रतिष्ठानच्या वेळी इंडिया आघाडीने निमंत्रण स्वीकारलं नाही. हे लोक हिंदू धर्माच्या शक्तीला समाप्त करु इच्छित आहेत. अशा ‘इंडिया’ आघाडीला महाराष्ट्रात एक तरी जागा जिंकू देऊ नका. –**नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### ‘संविधान संकटात ही अफवा’

» मोदी पुन्हा सरकारमध्ये आले तर लोकशाही आणि संविधान संकटात येईल, अशी अफवा ‘इंडिया’ आघाडी पसरवत आहे.. मी जेव्हा राजकारणात आलो तेव्हापासून प्रत्येक निवडणुकीत हा प्रकार केला जातो. यांच्याकडे नवी कल्पनाही नाही. आणीबाणीच्या वेळी लोकशाही धोक्यात आली नव्हती का, असा सवाल मोदी यांनी केला.

### गडकरींसाठी मोदींची पहिलीच सभा

» नितीन गडकरी यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान मोदी यांनी नागपूर जिल्ह्यात प्रथमच प्रचारसभा घेतली. २०१४ आणि २०१९ अशा सलग दोन निवडणुका गडकरी निवडून आले होते. मात्र तेव्हा त्यांच्या प्रचारासाठी मोदींची सभा झाली नव्हती. बुधवारची सभाही नागपूरमध्ये नसली, तरी शहरालगतच रामटेक लोकसभा मतदारसंघातील कन्हान येथे झाली. मात्र नागपूर, रामटेक आणि गोंदिया-भंडारा या तीन मतदारसंघासाठी ही सभा असल्याचे भाजपकडून सांगण्यात आले होते.

---

# दिशाभूल करणाऱ्या कंपन्यांवर कारवाईबाबत सरकार अपयशी!

## पतंजली प्रकरणावरुन सर्वोच्च न्यायालयाचे ताशोरे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रकाशित केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने स्वयंघोषित योगगुरू रामदेव आणि पतंजली आयुर्वेदचे व्यवस्थापकीय संचालक बाळकृष्ण यांचा माफीनामा बुधवारी दुसऱ्यांदा फेटाळला. त्याचबरोबर ग्राहकोपयोगी वस्तूंची विक्री करणाऱ्या कंपन्या ग्राहकांच्या आरोग्याशी खेळत असल्याबद्दल आणि त्यांच्यावर कारवाईत सरकार अपयशी ठरत असल्याबद्दल खंडपीठाने तीव्र चिंता व्यक्त केली.**

नेहमी सर्वसामान्य लोकच बळी ठरत असतात. कारण, ग्राहकोपयोगी वस्तूंची विक्री करणाऱ्या कंपन्या आपल्या उत्पादनांविषयी ग्राहकांसमोर मोहक चित्र उभे करतात. या कंपन्यांच्या उत्पादनांसाठी लोक चांगले पैसेही मोजतात, पण अंतिमत: त्यांना त्यांच्या आरोग्याची किंमत मोजावी लागते. त्याबद्दल आम्हाला अतिशय चिंता वाटते, अशी टिप्पणी न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह यांच्या खंडपीठाने केली.

‘पतंजली आयुर्वेद’ने करोना साथीच्या काळात केलेल्या आक्षेपार्ह आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींविषयी खंडपीठाने पुन्हा एकदा रामदेव आणि बाळकृष्ण




यांच्यावर कठोर शब्दांत ताशेरे ओढले. करोना महासाथ सुरू असताना, मधुमेहापासून लठ्ठपणापर्यंत आणि करोनापासून यकृतदाहापर्यंत सर्व प्रकारच्या रोगांवरील उपचारांचा दावा करणाऱ्या ‘पतंजली आयुर्वेद’च्या जाहिराती म्हणजे औषधे आणि उपचार कायद्याचे (१९५४) सहेतूक केलेले उल्लंघन होते, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

‘माफीपत्र नव्हे निव्वळ कागद’

न्यायालयाला दिलेल्या हमीचे उल्लंघन केल्याप्रकरणी रामदेव आणि बाळकृष्ण यांना ‘कारणे दाखवा’ नोटीस बजावण्यात आली होती, परंतु त्यांनी प्रामाणिकपणे न्यायालयासमोर येणे टाळले. त्यांची ही कृती अतिशय अस्वीकारार्ह आहे, असा संताप खंडपीठाने व्यक्त केला. तसेच या संपूर्ण प्रकरणाचा इतिहास आणि न्यायालयाचा अवमान करणाऱ्यांची वृत्ती पाहता नवा माफीनामा आम्ही फेटाळत आहोत, असे सुनावत, “तुमचा माफीनामा म्हणजे निव्वळ कागद आहे,” अशी चपराकही न्यायालयाने लगावली.

### उत्तराखंड सरकारचीही खरडपट्टी

» पतंजली आयुर्वेदच्या उत्पादनांना परवाना देणाऱ्या उत्तराखंड सरकारचा संबंधित विभाग आणि अधिकाऱ्यांचीही खंडपीठाने खरडपट्टी काढली. पतंजलीच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरात प्रकरणाबाबत उत्तराखंड सरकार निष्क्रिय राहिले. ही निष्क्रियता सहज दुर्लक्षित करण्यासारखी नाही. या प्रकरणात संबंधित सरकारी विभागाने जाणीवपूर्वक डोळ्यांवर झापड ओढल्याचे दिसते, असे भाष्यही न्यायालयाने केले. तुम्ही (रामदेव, बाळकृष्ण) ज्या तिरस्काराच्या भावनेतून न्यायालयाला दिलेल्या हमीचे आणि न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन केले तोच न्याय तुमच्या या माफीपत्राला आम्ही का लावू नये?- सर्वोच्च न्यायालय

# 'पिरतीचा वनवा उरी पेटला' मालिकेतील अभिनेता अडकला लग्नबंधनात,



'पिरतीचा वनवा उरी पेटला' या मालिकेतील बलराम म्हणजे अभिनेता हेमंत फरांदेने लग्नगाठ बांधून आयुष्याच्या नव्या प्रवासाला सुरुवात केली आहे. अभिनेत्याने मोनिका हेमंत हिच्याशी मोठ्या धुमधडाक्यात लग्न केलं. या लग्नसोहळ्याला 'पिरतीचा वनवा उरी पेटला' मालिकेतील कलाकार मंडळी उपस्थित राहिली होती. या सर्व कलाकारांनी हेमंतच्या लग्नात धमाल केली. हेमंत व मोनिकाच्या लग्नाचे व्हिडीओ 'मराठी मनोरंजनविश्व' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आले आहेत.

लग्नासाठी हेमंत व मोनिकाने खास दोन लूक केले होते. सुरुवातीला दाक्षिणात्य लूकमध्ये दोघं पाहिला मिळाले. हेमंतने लुंगी व त्यावर गडद जांभळ्या रंगाचा शर्ट परिधान केला होता. तर मोनिकाने सोनरी रंगाची साडी नेसली होती. या साडीला हेमंतला मॅचिंग करण्यासाठी गडद जांभळ्या रंगाची किनारी होती. त्यानंतर दोघं वेगवळ्या लूकमध्ये पाहायला मिळाले. सध्या हेमंत व मोनिकाला इतर कलाकार मंडळी शुभेच्छा देताना दिसत आहेत.

# आडनावावरून फिल्म इंडस्ट्रिमध्ये काम मिळत नाही असे नाही : सविता प्रभुणे

मराठी व हिंदी सिनेसृष्टीतील अनेक कलाकार त्यांना या क्षेत्रात करिअर करताना आलेले अनुभव सांगत असतात. काही कलाकारांना काम मिळवताना अडचणींचा सामना करावा लागतो. मराठी सिनेसृष्टीत आडनावामुळे काम न मिळाल्याच्या तक्राराही कलाकारांकडून होत असतात, पण आपल्याला असा कोणताच अनुभव आला नाही, असं अभिनेत्री सविता प्रभुणे यांनी म्हटलं आहे.

अनेक हिंदी व मराठी चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारणाऱ्या सविता प्रभुणे यांनी लोकप्रिय मालिकांमध्येही काम केलं आहे. 'पवित्र रिश्ता' या मालिकेत त्यांनी अर्चना म्हणजेच अंकिता लोखंडेच्या आईचं पात्र साकारलं होतं, या पात्रामुळे त्या घरोघरी पोहोचल्या. सविता यांना 'तारांगण' ला दिलेल्या मुलाखतीत आडनावावरून भेदभाव होतो का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी उत्तर दिलं आहे. सविता प्रभुणे म्हणाल्या, "नाही. मला आतापर्यंत असा अनुभव हिंदीमध्ये किंवा मराठीमध्ये कधीच आला नाही की तुम्ही विशिष्ट आडनावाचे आहात म्हणून तुम्हाला काम मिळतंय किंवा मिळत नाही. मला उलट या इंडस्ट्रीचा अभिमान आहे की असा भेदभाव कधीच केला जात नाही, म्हणजे मला तरी तसा अनुभव नाही."

दरम्यान, काही दिवसांपूर्वी ज्येष्ठ मराठी अभिनेत्री उषा नाईक यांनी आडनावांवरून मराठी इंडस्ट्रीत भेदभाव होत असल्याचं म्हटलं होतं. तुमचे बऱ्याच चित्रपटात कॅमिओ आहेत, मोठ्या भूमिका नाहीत, असं का? यावर उषा नाईक म्हणाल्या होत्या, "त्याचं कारण मला माहिती नाही. मी स्पष्ट बोलणारी असल्यामुळे सांगते की माझ्या आडनावामुळे मला बऱ्याच ठिकाणी डावलण्यात आलं. मी नाईक आहे. मी अगदी देशपांडे, जोशी, कुलकर्णी असते तर खूपच कौतुक झालं असतं. पण माझं तसं नाही झालं. या वयात आल्यानंतर स्पष्ट बोलायला काही हरकत नाही.


# बॉयफ्रेंडशी गुपचूप लग्न करण्याबाबत तापसी पन्नूने सोडलं मौन

तापसी पन्नूने तिचा प्रियकर मॅथियास बो याच्याशी २३ मार्च रोजी उदयपूरमध्ये लग्न केलं. तिच्या लग्नाला दोघांचे कुटुंबीय व मोजकेच मित्र उपस्थित होते. लग्नाला जवळपास २० दिवस झाल्यानंतर पहिल्यांदाच तापसीने आपलं लग्न गुपित का ठेवलं याबाबत माहिती दिली आहे. तापसी आणि मॅथियास यांनी लग्न केलं, पण त्याबद्दल सोशल मीडियावर फोटो शेअर केला नाही. तसेच इंडस्ट्रीतील मोजकेच लोक तिच्या लग्नाला उपस्थित होते. त्यामुळे तिच्या लग्नाबाबत फारशी कुणालाच माहिती नव्हती. आता तापसीने लग्न गुपित का ठेवलं, याबाबत खुलासा केला आहे. हिंदुस्तान टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत तापसी म्हणाली, "मला माहित नाही की मी माझं वैयक्तिक आयुष्य सार्वजनिक करावं की नाही. कारण लोक खूप लवकर जजमेंट्स देतात. मी आयुष्यात याच रितीने पुढे गेले आहे. माझा जोडीदार किंवा लग्नात सहभागी झालेले लोक नाही. त्यामुळे माझं लग्न मी स्वतःपुरतं ठेवलंय."

तापसी पुढे म्हणाली, "माझ्या लग्नाची माहिती लपवून ठेवण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता. पण फक्त त्याचीच चर्चा होईल, असा सार्वजनिक सोहळाही मला नको होता. त्यामुळे फोटो किंवा व्हिडीओ शेअर करण्याचा माझा कोणताही विचार नाही आणि त्यासाठी मी अजुन मानसिकदृष्ट्या तयार आहे असं मला वाटत नाही. मला माहित आहे की जे लोक माझ्या लग्नात हजर होते ते माझ्यासाठी तिथे आले होते, मी जे करतेय त्यावर त्यांचं मत देण्यासाठी नाही. त्यामुळे मी निवांत होते."



# जान्हवी कपूरने घातला बॉयफ्रेंड शिखरच्या नावाचा नेकलेस, फोटो चर्चेत



बॉलीवूडची अभिनेत्री जान्हवी कपूर अभिनयासह तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे अनेकदा चर्चेत असते. वाढदिवसाच्या निमित्तानं जान्हवी तिचा बॉयफ्रेंड शिखर पहारियासह तिरुपतीला गेली होती. जान्हवीनं 'कॉफी विथ करण'च्या आठव्या पर्वात बहीण खुशीबरोबर हजेरी लावली होती. या शोमध्ये तिनं वैयक्तिक आयुष्याबद्दलही खुलासा केला होता. तिनं शिखर पहारियाबरोबर रिलेशनशिपमध्ये असल्याची कबुलीही दिली होती. नुकतीच जान्हवी कपूर वांद्रे येथून सिद्धिविनायक मंदिरापर्यंत अनवाणी पायाने चालत गेली. तिच्याबरोबर तिचा बॉयफ्रेंड शिखर पहारिया याची आई स्मृती पहारियादेखील होत्या. जान्हवीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. अशातच जान्हवी तिच्या बॉयफ्रेंडमुळे आता पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. अजय देवगणच्या 'मैदान'च्या स्क्रीनिंगसाठी जान्हवीनं हजेरी लावली होती. त्या दिवशी जान्हवीनं फॉर्मल लूक केला होता. सफेद ब्लेझर, मॅचिंग पॅन्ट्स आणि मिनिमल ज्वेलरीची निवड करीत जान्हवीनं हा लूक पूर्ण केला. पण, या लूकमध्ये लक्षवेधक ठरला तो म्हणजे जान्हवीचा नेकलेस.

जान्हवीने खास 'शिकू'च्या नावाचा नेकलेस परिधान केला होता. जान्हवीच्या नेकलेसमधील हा फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. जान्हवीनं हा खास नेकलेस घालून शिखरबरोबरच्या नात्याबद्दलची पुष्टी केली आहे. फिल्मिग्यान या पापाराझी अकाउंटवरून हा फोटो शेअर करण्यात आला आहे. जान्हवीच्या या फोटोवर चाहत्यांच्या कमेंट्सचा वर्षाव होताना दिसतोय. एका चाहत्यानं कमेंट करीत लिहिलं, "नजर नको लागायला." तर दुसऱ्यानं लिहिलं, "खूप क्यूट आहे.

दरम्यान, जान्हवीच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' या चित्रपटात जान्हवी वरुण धवनबरोबर झळकणार आहे.

# दिवंगत अभिनेत्री अश्विनी एकबोटेंच्या मुलाचं पार पडलं व्याही भोजन!




दिवंगत अभिनेत्री अश्विनी एकबोटे यांचं नाव मराठी सिनेसृष्टीत अत्यंत अदबीनं घेतलं जातं. २०१६ साली पुण्यातील भरत नाट्यमंदिरात प्रयोग सुरु असताना त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यांचं निधन झालं. त्यांच्या अचानक जाण्याने संपूर्ण मराठी सिनेसृष्टी हादरली होती. पण अश्विनी एकबोटे यांनी त्यांच्या दमदार अभिनयाने मराठी रसिक प्रेक्षकांच्या मनात कायमचं स्थान निर्माण केलं आहे. लवकरच त्यांचा मुलगा शुभंकर एकबोटे लग्नबंधनात अडकणार आहे. नुकताच त्याचा व्याही भोजनाचा कार्यक्रम पार पडला.

अश्विनी एकबोटे यांचा मुलगा शुभंकर आईच्या पावलावर पाऊल ठेवून अभिनय क्षेत्रात काम करत आहे. शुभंकर 'सन मराठी' वाहिनीवरील लोकप्रिय मालिका 'कन्यादान' मधील त्यांची ऑनस्क्रीन बायको वृंदा म्हणजे अभिनेत्री अमृता बनेबरोबर खऱ्या आयुष्यात लग्नबंधनात अडकणार आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात शुभंकर व अमृताचा साखरपुडा मोठ्या थाटामाटात झाला होता. या साखरपुड्याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते.

# गुजरातने राजस्थानचा विजयरथ रोखला!

## राशिद खानच्या खेळीच्या जोरावर 3 विकेट्सनी नोंदवला शानदार विजय

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**आयपीएलच्या १७व्या हंगामातील २४ वा सामना जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियम येथे खेळला गेला. या सामन्यात राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स आमनेसामने आले होते. ज्यामध्ये राजस्थान रॉयल्सच्या विजयरथाला रोखत गुजरात टायटन्सने ३ विकेट्सनी शानदार विजय नोंदवला. या सामन्यात राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना पराग सॅमसनच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर गुजरातला १९७ धावांचे लक्ष्य दिले होते. मात्र, प्रत्युत्तरात राशिद खानने शेवटच्या चेंडूवर गुजरातला रोमहर्षक विजय मिळवून दिला.**



लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातची सुरुवात चांगली झाली. शुबमन गिल आणि साई सुदर्शन यांच्यात ६४ धावांची भागीदारी झाली, पण त्यानंतरही संघाला सतत धक्के बसत राहिले पण शेवटी सामना रोमांचक झाला. राशिद खानने शेवटच्या षटकांमध्ये ११ चेंडूत २४ धावांची शानदार खेळी करत गुजरातच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. गुजरातकडून सुदर्शनने ३५ धावा केल्या. दरम्यान, कुलदीप सेनच्या घातक गोलंदाजीने गुजरातच्या मधल्या फळीला हादरा दिला होता. त्याने ३ महत्त्वाचे विकेट्स घेत गुजरातला बॅकफूटवर पाठवले होते. गिलने ४४ चेंडूत ७२ धावांची खेळी खेळली, मात्र दुसऱ्या टोकाकडून सहकार्य न मिळाल्याने सामना फसला होता.

१५ षटकांनंतर गुजरातची धावसंख्या ५ गड्यांच्या मोबदल्यात १२४ धावा होती आणि त्यांना विजयासाठी अजूनही ७३ धावांची गरज होती. गुजरातसाठी शुबमन गिल तारणहार ठरला, तर त्याला १६व्या षटकात युजवेंद्र चहलने हुशारीने यष्टिचित केले. शेवटच्या ३ षटकात गुजरातला ४२ धावांची गरज असल्याने सामना फसला होता, राहुल तेवतिया आणि शाहरुख खानच्या रूपाने दोन तुफानी फलंदाज क्रीजवर होते. शाहरुखच्या ८ चेंडूत १४ धावांच्या खेळीने गुजरातच्या विजयाच्या आशा उंचावल्या, मात्र तो आवेश खानच्या हातून बाद झाला. अखेरच्या षटकात गुजरातला विजयासाठी १५ धावांची गरज असल्याने सामन्यात जीवदान शिल्लक होते. दुसरीकडे, राशिद खानने शेवटच्या षटकातील शेवटच्या चेंडूवर चौकार मारून आयपीएल २०२४ मधील राजस्थानच्या विजयरथ ४ रोखला. राजस्थानकडून कुलदीप सेनने ३, युजवेंद्र चहलने २ आणि आवेश खानने एक विकेट घेतली.

तत्पूर्वी पावसाने व्यत्यय आणलेल्या या सामन्यात राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना ३ गडी गमावून १९६ धावा केल्या आणि गुजरातसमोर १९७ धावांचे लक्ष्य ठेवले. या सामन्यात यशस्वी जैस्वाल आणि जोस बटलर यांच्यात पहिल्या विकेटसाठी ३२ धावांची भागीदारी झाली. जैस्वाल पाच चौकारांच्या मदतीने २४ धावा करून बाद झाला, तर गेल्या सामन्यात नाबाद शतक झळकावणाऱ्या बटलरला केवळ आठ धावा करता आल्या. राशिद खानने त्याला बाद केले. या फिरकीपटूने अनुभवी फलंदाजाला टी-२० क्रिकेटमध्ये पाचव्यांदा बाद केले.

### सॅमसन-परागची 130 धावांची भागीदारी

यानंतर संजू सॅमसन आणि रियान पराग यांनी डाव सांभाळला. दोघांमध्ये तिसऱ्या विकेटसाठी १३० धावांची मोठी भागीदारी केली. या सामन्यात दोघांनी अर्धशतके झळकावली. युवा फलंदाज रियान पराग यंदा अप्रतिम फॉर्ममध्ये दिसत आहे. त्याने याआधी दोन अर्धशतके झळकावली असून या सामन्यातही परागने स्फोटक खेळी केली. दुसऱ्या टोकाकडून कर्णधार संजू सॅमसननेही आपली ताकद दाखवून दिली. परागने अवघ्या ४८ चेंडूंत ३ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ७८ धावांची शानदार खेळी केली. संजू सॅमसननेही ३८ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ६८ धावांची नाबाद खेळी खेळली. या सामन्यात गुजरात टायटन्सचे गोलंदाजी आक्रमण विकेट घेण्यासाठी संघर्ष करताना दिसले. गुजरातकडून उमेश यादव, राशिद खान आणि मोहित शर्माने प्रत्येकी एक विकेट घेतली.

# रेयाल-मँचेस्टर सिटीतील रंगतदार लढत बरोबरीत

## चॅम्पियन्स लीग फुटबॉल : फुटबॉलच्या उपांत्यपूर्व फेरीतील पहिल्या टप्प्याची लढत चुरशीची

**माद्रिद। वृत्तसंस्था**

**रेयाल माद्रिद आणि मँचेस्टर सिटी या दोन बलाढ्य संघांमधील चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या उपांत्यपूर्व फेरीतील पहिल्या टप्प्याची लढत अपेक्षेप्रमाणे चुरशीची झाली. दोन्ही संघांचा आक्रमक खेळावर भर होता. अखेरीस ही रंगतदार लढत ३-३ अशी बरोबरीत संपली. उभय संघ पुढील आठवड्यात पुन्हा दुसऱ्या टप्प्यातील लढतीत आमनेसामने येतील.**



"दोन्ही संघांनी मिळून सहा गोल केले. त्यामुळे चाहत्यांचे मनोरंजन झाले असेल याची मला खात्री आहे," असे सामन्यानंतर मँचेस्टर सिटीचे प्रशिक्षक पेप गॉर्डियोला म्हणाले. सिटीचा संघ आपल्या आक्रमक खेळासाठी ओळखला जातो. उपांत्यपूर्व फेरीतील पहिल्या टप्प्याची लढत रेयालचे घरचे मैदान असलेल्या बेर्नेबाओ स्टेडियमवर झाली असली, तरी सिटीने आपल्या शैलीतच खेळ केला. सिटीला दुसऱ्याच मिनिटाला आघाडी मिळवण्यात यश आले होते. मात्र, त्यानंतर रेयालने दमदार पुनरागमन करताना पूर्वार्धात दोन गोल नोंदवले. उत्तरार्धातही दोन्ही संघांचा गोलधडाका कायम राहिला. सिटीने पाच मिनिटांच्या अंतराने दोन गोल करत आघाडी मिळवली. परंतु काही मिनिटांतच माद्रिदने बरोबरी करण्यात यश मिळवले.

या लढतीत सिटीसाठी बेर्नार्डो सिल्वा (दुसऱ्या मिनिटाला), फिल फोडेन (६६व्या मि.) आणि जोस्को ग्वार्डिओल (७१व्या मि.) यांनी गोल नोंदवले. विशेष म्हणजे हे तिघांनीही गोलकक्षाबाहेरून अप्रतिम फटका मारत गोल केले. माद्रिदसाठी रुबेन डियाज (१२व्या मि.; स्वयंगोल), रॉड्रिगो (१४व्या मि.) आणि फेडेरिको वालवेद्रे (७९व्या मि.) यांनी गोल नोंदवले.

### आर्सेनलने बायर्नला रोखले

चॅम्पियन्स लीगच्या उपांत्यपूर्व फेरीतील अन्य लढतीत आर्सेनलने बायर्न म्युनिकला बरोबरीत रोखण्यात यश मिळवले. आर्सेनलच्या घरच्या मैदानावर झालेली पहिल्या टप्प्यातील लढत २-२ अशी बरोबरीत संपली. बुकायो साकाने (१२व्या मिनिटाला) आर्सेनलसाठी पहिला गोल केला. मात्र, सर्ज गनाब्रि (१८व्या मि.) आणि हॅरी केन (३२व्या मि.) यांनी केलेल्या गोलमुळे मध्यंतरापूर्वी बायर्नने आघाडी मिळवली. उत्तरार्धात बदली खेळाडू म्हणून मैदानात आलेल्या लिआंड्रो ट्रिसार्डने (७६व्या मि.) आर्सेनलला बरोबरी करून दिली. आता उभय संघ पुढील आठवड्यात दुसऱ्या टप्प्यातील लढत खेळतील.